महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : irdho123@gmail.com website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५९

जा.क्र. औसंवि/अ/मानक बोली दस्ताऐवज/००६७१ दिनांक : ०६/०१/२०२५

# परिपत्रक

विषय : कंत्राटी पध्दतीवर बाहयस्त्रोत कंत्राटी कामगारांच्या सेवा घेण्यासंदर्भात Standard Bidding Document (SBD) मध्ये सुधारणा करणेबाबत.

संदर्भ : SBD परिपत्रक क्र. IR/A/SBD/२९३८१ दि. २३/१०/२०१९.

***************

सांघिक कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये महावितरण कंपनीतील विविध कार्यालयात कंत्राटदारामार्फत कंत्राटी कामगारांची सेवा घेण्यासंदर्भात ई-निविदा काढण्याची प्रक्रीयेतील अटी व शर्तीमध्ये एकसमानता राहावी या दृष्टीने मानक बोली दस्ताऐवज (SBD) प्रसारीत करण्यात आले होते.

२. तथापि, महावितरण कंपनीतंर्गत विविध कार्यालयात मनुष्यबळ पुरवठा करण्याकरीता ई-निविदा प्रसारीत करतांना अनेक अडचणी व समस्यांना सामोरे जावे लागत असल्यामुळे मानक बोली दस्ताऐवज (SBD) च्या अटी व शर्तीमध्ये सुधारणा करण्याबाबतची बाब कंपनी प्रशासनाच्या विचाराधिन होती.

३. आता, मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांनी संचालक (वित्त) व संचालक (मानव संसाधन) यांचेशी विचारविनिमय करून SBD परिपत्रक क्र. IR/A/SBD/२९३८१ दि. २३/१०/२०१९ मधील प्रचलित तरतूदींमध्ये खालीलप्रमाणे नविन अटींचा समावेश / सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे.

अ. कंत्राटदारामार्फत कंत्राटी कामगार रिक्त पदाच्या अनुषंगाने ई-निविदेनुसार घेण्यात येत असून त्यांना देखील सुरक्षा साधने वापरणे बंधनकारक आहे. कंत्राटी कामगारांचा कामावर असतांना अपघात होवू नये यादृष्टीने कंत्राटी कामगारास विशिष्ट प्रकारची मानके असलेली सुरक्षा साधने उपलब्ध करून देण्याकरीता कंत्राटदारास देण्यात येणाऱ्या रकमेमध्ये मुळ वेतनाच्या फक्त **२% (दोन टक्के)** रक्कम दरमहा अतिरिक्त अदा करणे.

ब. SBD परिपत्रक क्र. २९३८१ दि. २३/१०/२०१९, परिच्छेद क्र. सेक्शन -३ '२ (क-vi)' अन्वये, कंत्राटी कामगारांचे वेतन बँक खात्यात जमा करणे अशी तरतूद आहे. त्यामध्ये आता अंशत: बदल करण्यात आला असून कंत्राटी कामगारांचे वेतन फक्त राष्ट्रीयकृत बँका / शेड्युल खाजगी बँकेमार्फत कंत्राटी कामगारांच्या बँक खात्यामध्ये अदा करण्यात यावे.

क. रोजगार व स्वयंरोजगार विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्र. रोस्वरो-२००२/प्र.क्र.२६७/रोस्वरो-१ दि.१७/०८/२००२ अन्वये, अप्रेंटिस सहकारी संस्थांना / बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना इसारा रक्कम (EMD) व सुरक्षा अनामत रक्कम (SD) भरण्यापासून सुट देण्याचे निर्देश आहेत. सबब, याबाबत शासन निर्णयातील

तरतुदीच्या अधिन राहून बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना इसारा रक्कम (EMD) व सुरक्षा अनामत रक्कम (SD) भरण्यापासून सुट देण्यात यावी.

ड. SBD परिपत्रक क्र. २९३८१ दि. २३/१०/२०१९, परिच्छेद क्र. सेक्शन -२ '४ (क)' अन्वये, कंत्राटदार संस्थेला देण्यात येत असलेल्या सेवा शुल्काच्या दराची मर्यादा हि मुळ वेतनाच्या (मुळ वेतन + विशेष भत्ता) च्या कमीत कमी १% व जास्तीत जास्त ५% पर्यंत देण्यात येत होती. त्यामध्ये आता बदल करण्यात आला असून महावितरण कंपनीत कंत्राटी कामगार पुरविणाऱ्या कंत्राटदार संस्थेला देण्यात येत असलेला सेवा शुल्काचा दर कमीत कमी **३.८५% व** जास्तीत जास्त **५.० % (Minimum 3.85% & Maximum 5.0%)** याप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

इ. मंडल कार्यालयामार्फत ई-निविदा प्रक्रीया राबवितांना कंत्राटदारामार्फत निविदा कालावधी संपल्यानंतर कमी करण्यात आलेल्या अथवा नव्याने कामावर घेतलेल्या कंत्राटी कामगारांची तपशिलवार माहीती कार्यालयास देणे बंधनकारक आहे. तसेच, कमी केलेल्या कंत्राटी कामगाराबाबत कारणासह सविस्तर माहिती संबंधित नियंत्रण अधिकारी यांना सादर करणे आवश्यक आहे. तसेच, ई-निविदा प्रक्रीया राबविताना विभागातंर्गत बऱ्याच वर्षापासून एका शाखा कार्यालयात कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांना त्यांच्या अनुभव व पात्रतेनुसार इतर शाखा कार्यालयात अशा कंत्राटी कामगारांची आवश्यकता असेल त्या ठिकाणी त्यांची कंत्राटदारामार्फत नियुक्ती करणे.

फ. कंत्राटी कामगार पुरविण्याचा कार्यकाल संपुष्टात आल्यानंतर सदर संस्थेतंर्गत कार्यरत असणाऱ्या कंत्राटी कामगारांना कंत्राटदार संस्थेने त्यांच्या Letter Head वर अनुभवाचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

४. SBD परिपत्रक क्र. २९३८१, दि. २३/१०/२०१९ मधील इतर तरतूदीमध्ये कोणताही बदल करण्यात आला नसून त्या अबाधीत राहतील.

५. सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या Employee Portal या संकेतस्थळावर Industrial Relations Department येथे प्रसिद्ध करण्यात आले असून, सदर परिपत्रकाची मुद्रांकित प्रत कोणत्याही कार्यालयास देण्यात येणार नाही.

**(संजय रा. ढोके)**
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

प्रत :-

१. प्रेषण यादीप्रमाणे महावितरण कंपनीतील कार्यकारी अभियंता व तत्सम स्तरापर्यंत.
२. उप महाव्यवस्थापक (मा.व तं.- संपर्क पोर्टल), महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई.
- **कृपया संपर्क पोर्टलमध्ये उपरोक्तपणे नविन अटींचा समावेश / सुधारणा करण्याबाबत योग्य कार्यवाही करण्यात यावी.**

D:\SSPisey 3\OUTSOURCING\Tender.docx